आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,मुंबई यांना भाडे तत्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र **MEDD-13/19/2026-MMD(Aush-2)**
गो. ते. रुग्णालय आवार इमारत, ९ वा मजला,
लो. टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दि. २८ जुलै, २०२६.

संदर्भ:-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: वित्तअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विवनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र: भाखांस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विवनियम, दिनांक २८.०७.२०२०.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: शापसे-३४२२/प्र.क्र.७८/का.३१, दिनांक ०१.०६.२०२३.

५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र/२०२५वाहन .प्रविनियम/१९.क्र., दि१७ ./०९/२०२५.

६) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,मुंबई यांचे पत्र क्र. जा. क्र. भांडार/वाहन भाडे/१७२-२०२६/३ब , दिनांक १७/०७/२०२६.

प्रस्तावना:-

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई हे पद उन्नत करून सदर पदावर सचिव दर्जाचे अधिकारी श्री. तुकाराम मुंढे, भाप्रसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि.१७/०९/२०२५ मधील तक्त्यातील अ. क्र. ३ येथे नमुद केल्यानुसार सचिव दर्जाचे अधिकारी यांच्याकरिता २५ लक्ष किमती पर्यंतचे वाहन अनुज्ञेय आहे. त्यामुळे सद्यस्थितीत आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना वाहन भाडे तत्वावर उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचारधीन आहे.

शासन निर्णय:-

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.०४ येथे नमूद शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या खाजगी पुरवठादारांच्या पॅनलमधील सेवापुरवठादारांकडून तसेच, सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार विवरणपत्र-अ मधील अनुक्रमांक ७ मध्ये नमूद वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून घेण्यास व त्याच्या भाड्यापोटी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च वित्तीय वर्ष २०२६-२७ च्या मंजूर अनुदानातून खालील लेखाशिर्षाअंतर्गत भागविण्यात यावा.

योजनाबाहय मागणी क्र एस १ - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या वरील भांडवली खर्च ०६ - सार्वजनिक आरोग्य. (१०२) - अन्न भेसळ प्रतिबंध (०१) (०१) - अन्न भेसळ प्रतिबंध करण्यासाठी आस्थापना (२२१०२७०१) 13- कार्यालयीन खर्च

३. सदर सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी नियमानुसार सेवापुरवठादार संस्थेसोबत करारनामा करावा.

४. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग दोन, अनुक्रमांक-१३, नियम क्र. ६० व ६१ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. भाडेतत्त्वावर वाहन घेताना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

६.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२८१८३७११५९५५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT RAMESH JAGTAP

Digitally signed by AJIT RAMESH JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=1C57E2746855B8B01D38F9CBD79DC87F2AF58135CF485D243D93EBF54C900920, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=62896254F9FECC7DA7B3BA8FDC28BAB4A5C1238D1090C223FD8574F24BA7CA52, cn=AJIT RAMESH JAGTAP
Date: 2026.07.28 21:10:26 +05'30'

(अजित जगताप)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल-महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी कोषागार अधिकारी, मुंबई.
६. उपसचिव (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (विनियम / व्यय-१३).
८. निवड नस्ती (औषधे-२).